'अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी' पदावर
दि.०१/०१/२०२० रोजी काम करणाऱ्या
अधिकाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासुची
प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८
क्र.प्रशा/१२/कावि/ २० /२०२१
दिनांक ०७ / ०१ /२०२१

वाचले : क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११
२) **'अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** पदाची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतासुची आदेश क्र.प्रशा/१२/कावि/९३/२०१९ दि. २२/०१/२०१९
३) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/५४५/२०२० दि. २७/१०/२०२०
४) प्रशासन विभागाकडील दि. ०६ / ०१ /२०२१ चा मान्य प्रस्ताव

## आदेश

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११ अन्वये यापुर्वी प्रसिध्द झालेली अंतिम सेवाजेष्ठतासुची, चालु वर्षात पुन्हा नव्याने तात्पुरती (Provisional) प्राथमिक जेष्ठतासुची तयार करताना विचारात घेतली जाणार नाही व प्रसिध्द करण्यात येणार नाही. केवळ त्या संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional) प्राथमिक जेष्ठतासुची तयार करून प्रसिध्द करावी असे निर्देश आहेत. तसेच प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/२०१३ दि.३१/०५/२०१३ मधील मुद्दा क्र.५ मध्ये **"ज्या संवर्गात संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश नसेल अशा संवर्गाची फक्त अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्द करण्यात येईल."** असे नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **'अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** पदावर काम करणाऱ्या ०१ अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासुची उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर दि.०१/०१/२०१९ ते दि. ३१/१२/२०१९ या कालावधीत उपरोक्त पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियमित नियुक्त अधिकाऱ्यांचा समावेश नसल्याने, **'अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** पदावर **दि.०१/०१/२०२०** रोजी काम करणाऱ्या नियमित ०१ अधिकाऱ्यांची फक्त अंतिम सेवाजेष्ठतासुची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतिम जेष्ठतासुची महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.२१/१०/२०११ मधील सुचनांनुसार तयार केली आहे.

ही अंतिम सेवाजेष्ठतासुची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज / याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
अतिरिक्त आयुक्त १
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

--------------------

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासुची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

प्रशासन अधिकारी (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

## अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाची दि.01/01/2020 रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासूची

**वेतनश्रेणी :- 15,600-0-39,100 ग्रेड वेतन :- 7600**

| अ.क्र | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 4805 | साळवे पवन वसंत | अनुसूचीत जाती | एम.बी.बी.एस., एम.डी., पी.एस.एम. | 08/05/1965 | 17/09/2012 | पदोन्नती | वैद्यकीय अधिकारी | 14/09/1992 | 31/05/2023 | |

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.

सही/-
अतिरिक्त आयुक्त 1
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.